महाराष्ट्र शिक्षण सेवा गट ब (तां.) या संवर्गातील जाहिरात क्र.९१/२०१३ मधील प्रतीक्षा यादीतील शिफारशीत श्री.किशोर विनायक भदाने यांची नामनिर्देशाने करण्यात आलेली नियुक्ती रद्द करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
शासन आदेश क्रमांक: व्यशिअ-२०१९/प्र.क्र.०७)/व्यशि-१
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २८ मे, २०१९.

संदर्भ:- १) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे गोपनीय पत्र क्र.१५(२)(१२०)/६५८/सात-अ, दि.१६.०९.२०१६.
२) कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचे क्र.व्यशिअ-२०१६/ (२१७/१६)/ व्यशि-१. दि.३१.०७.२०१७ रोजीचा शासन आदेश.
३) कौशल्य विकास उद्योजकता विभाग, क्र. न्यायाप्र-२०१६/(२२२/१६)/व्यशि-१ दि.१८.०८.२०१७ रोजीचा शासन आदेश
४) कौशल्य विकास उद्योजकता विभाग, क्र. न्यायाप्र-२०१६/(२२२/१६)/व्यशि-१ दि.२४.०९.२०१८ रोजीचा शासन आदेश
५) शासनाचे क्र.व्यशिअ-२०१९/प्र.क्र.०७/व्यशि-१, दि.२३.१.२०१९ रोजीचे पत्र.
६) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र.३/आस्था-१/२०१८/प्र.क्र.२०९, दि.०२.०३.२०१८.
७) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१८/व्ही.आय.पी./ प्र.क्र.२०७/कार्या.१२, दि.२८.५.२०१८.

आदेश

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत महाराष्ट्र शिक्षण सेवा गट ब (तांत्रिक) या संवर्गातील प्राचार्य/उपप्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुख्याध्यापक/अभियांत्रिकी अधीक्षक, शासकिय तंत्र माध्यमिक शाळा, या पदांवर वेतनश्रेणी रु.९३००-३४८००/- ग्रेड पे रु.४८००/- (सहावा वेतन आयोग) जाहिरात क्र.९१/२०१३ च्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संदर्भाधीन क्र.१ च्या पत्रान्वये प्रतीक्षा यादीतून शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांना संदर्भाधीन क्र.२ येथील शासन आदेशान्वये ते ज्या दिनांकापासून पदाचा कार्यभार स्विकारतील त्या दिनांकापासून २ वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी नामनिर्देशनाद्वारे तात्पुरती नियुक्ती देण्यात आली होती. तथापि, संदर्भाधीन क्र.३ येथील शासन आदेशान्वये सदर नियुक्ती आदेशास तात्पुरती स्थगिती देण्यात आली होती. तद्नतर दि.१८.८.२०१७ रोजीच्या शासन आदेशान्वये देण्यात आलेली तात्पुरती स्थगिती संदर्भाधीन क्र.४ येथील दि.२४.९.२०१८ रोजीच्या आदेशान्वये उठविण्यात आली.

२. संदर्भाधीन क्र.२ येथील आदेशातील अ.क्र.१० येथील श्री.किशोर विनायक भदाने हे नवनियुक्तीच्या पदावर विहित मुदतीत रुजू झालेले नाही. तथापि, तद्नंतर श्री.भदाने यांनी त्यांना नवयिुक्तीच्या रुजू करुन घेण्याबाबत शासनास केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने श्री.भदाने यांचेबाबत पुढील आवश्यक कार्यवाही करणेकरिता व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयास कळविण्यात आले होते. श्री.भदाने यांना नवनियुक्तीच्या पदावर रुजू

होणेबाबत संचालनालय व सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांचेकडून कळविण्यात आले. तथापि, श्री.भदाने हे या आदेशाच्या दिनांकापर्यंत रुजू झालेले नसल्यामुळे संदर्भाधीन क्र.७ येथील शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्री.किशोर विनायक भदाने यांची मुख्याध्यापक, शासकीय तांत्रिक शाळा, मनमाड, जि.नाशिक या पदावर नामनिर्देशनाने करण्यात आलेली नियुक्ती या आदेशान्वये रद्द करण्यात येत आहे.

३. सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र.: २०१९०५२८१४२९५०८१०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dr.Manish Sheshrao Milke

Digitally signed by Dr.Manish Sheshrao Milke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development And Entrepreneurship Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=116b8d4fe32ec9c9f7698810f585f3247df16981777aa4a590ca4347b30d6d0c, cn=Dr.Manish Sheshrao Milke
Date: 2019.05.28 14:36:26 +05'30'

(डॉ.मनिष शे.मिलके)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री.भदाने किशोर विनायक, घ.नं.४०, दोंडाईचा रोड, स्वामीरत्न इमारत, वसंतनगर, शहादा, ता.शहादा, जि.नंदूरबार-४२५ ४०९. (संचालकामार्फत)

प्रत,

१) संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई-१.
२) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नाशिक. (संचालकामार्फत)
३) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर. (संचालकामार्फत)
४) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, ५$^{१/२}$, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई-४०० ०२१. (पत्राद्वारे)
५) महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर. (संचालकामार्फत)
६) जिल्हा कोषागार अधिकारी, (सर्व संबंधित संचालकांमार्फत)
७) उपकोषागार अधिकारी, (सर्व संबंधित संचालकांमार्फत)
८) मुख्याध्यापक, शासकीय तंत्र माध्यमिक शाळा, मनमाड, जि.नाशिक (संचालकामार्फत)
९) निवड नस्ती (व्यशि-१)